करोना रुग्णांवर वाढीव दराने उपचार : राज्यातील पहिली कारवाई

ठाण्यातील खासगी रुग्णालयाची नोंदणी रद्द

घोडबंदरच्या 'होरायझन प्राइम'विरुद्ध अवाजवी शुल्क आकारणीची तक्रार

लोकसत्ता खास प्रतिनिधी

ठाणे : मुंबई महानगर क्षेत्रात काही खासगी कोविड रुग्णालये वाढीव दराने शुल्क आकारणी करीत असल्याच्या तक्रारी वाढत असताना ठाणे महापालिकेने शनिवारी अशाच तक्रारींवरून घोडबंदर भागातील 'होरायझन प्राइम' या खासगी रुग्णालयाची नोंदणी रद्द केली.

होरायझन प्राइम रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने रुग्णांना गैरवाजवी देयके आकारून वसुली केल्याची बाब महापालिकेने नेमलेल्या तज्ज्ञ समितीच्या प्राथमिक अहवालात उघड झाली आहे. वाढीव देयकांप्रकरणी कोविड रुग्णालयावर कारवाई झाल्याचे हे राज्यातील पहिलेच प्रकरण आहे.

रुग्ण दाखल करण्यास मनाई



होरायझन प्राईममध्ये दाखल असलेल्या रुग्णांवर आयसीएमआर आणि शासन आदेशानुसार औषधोपचार करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर त्यांच्याकडून शासकीय दरानुसार शुल्क आकारले जाणार आहे. याशिवाय, हे रुग्ण बरे होऊन घरी जाईपर्यंत द्विसदस्यीय पथक पूर्णवेळ तैनात करण्यात येणार आहे. या रुग्णालयात आता एकही नवीन रुग्ण उपचारासाठी दाखल करून घेतला जाणार नाही, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

या रुग्णालयाची नोंदणी एक महिन्यासाठी निलंबित करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी घेतला असून कोविड रुग्णालयाचा दर्जा कायमस्वरूपी रद्द करण्यात आला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील पहिले खासगी कोविड रुग्णालय मार्चमध्ये परवानगी देण्यात आली होती. हे रुग्णालय तसेच शहरातील इतर खासगी कोविड रुग्णालयांमधूनही वाढीव बिलांची आकारणी केली जात आहे, अशा तक्रारी होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिका मुख्य लेखा परीक्षक आणि ठाण्याचे उपजिल्हाधिकारी यांच्या संनियंत्रणात आयुक्तांनी विशेष लेखा परीक्षक पथक तयार केले होते. या पथकाने 'होरायझन प्राइम'मधील देयकांची चौकशी केली. या रुग्णालयाने २ एप्रिल ते १२ जुलै या कालावधीत एकूण ७९७ रुग्णांवर उपचार केले. त्यापैकी ५७ देयके लेखा परीक्षणासाठी पथकाकडे सादर करण्यात आली होती. ५६ देयके गैरवाजवी दराने आकारण्यात आल्याची बाब पथकाच्या निदर्शनास आली होती. या देयकांची आक्षेपार्ह रक्कम सहा लाख आठ हजार ९०० रुपये इतकी आहे. मुख्य लेखा परीक्षकांनी रुग्णालय व्यवस्थापनाला २० जुलै रोजी नोटीस बजावून याबाबत दोन दिवसांत स्पष्टीकरण देण्यास सांगितले होते. रुग्णालयाने कोणतेही स्पष्टीकरण दिले नव्हते.

१५ खासगी रुग्णालयांची चौकशी

ठाणे महापालिकेने मुख्य लेखा परीक्षक किरण तायडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक नेमले आहे. या पथकाने आतापर्यंत शहरातील १५ खासगी कोविड रुग्णालयांची तपासणी केली आहे. या पथकाकडे रुग्णालयांमधून आतापर्यंत एकूण १७५२ देयके प्राप्त झाली असून त्यापैकी ४८६ देयकांची तपासणी पथकाने पूर्ण केली आहे. त्यामध्ये पथकाने १९६ आक्षेपार्ह देयकांची नोंद केली असून त्यांची रक्कम २७ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. मुंबई, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली भागांतही खासगी कोविड रुग्णालयांकडून वाढीव देयके आकारली जात असल्याच्या तक्रारी आहेत.

मुंबईत २४ तासांत १,०९० रुग्ण

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबईतील उपचाराधीन करोना रुग्णांची संख्या कमी होत असली तरी मृत्युदर कमी करण्यात अद्याप यश आलेले नाही. शनिवारी ५२ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली असून, एकूण मृतांची संख्या सहा हजारांवर पोहोचली आहे. शनिवारी दिवसभरात मुंबईत १,०९० बाधितांची नोंद झाली आहे.

मुंबईतील ७३ टक्के रुग्ण आतापर्यंत करोनामुक्त झाले आहेत. राज्याच्या टक्केवारीपेक्षा हे प्रमाण जास्त आहे. राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ५७ टक्के आहे. शनिवारी १०९० नवीन रुग्णांची नोंद झाली असून, एकूण बाधितांचा आकडा १ लाख ७ हजार ९८१ इतका झाला आहे. शनिवारी ६१७ रुग्ण बरे होऊन घरी गेले. आतापर्यंत ७८,८७७ रुग्ण करोनामुक्त झाले आहेत, तर १,१९७ रुग्णांची स्थिती गंभीर आहे.

मुंबईतील करोनामुक्त रुग्णांचा आकडा वाढत असला तरी मृत्युदर अद्याप खाली आलेला नाही. मुंबईचा मृत्युदर सध्या ५.५ टक्के इतका आहे. शनिवारी ५२ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली. त्यात ४० रुग्णांना दीर्घकालीन आजार होते. चार रुग्णांचे वय ४० वर्षांखालील होते.

मुंबईत आतापर्यंत चार लाख ७० हजार चाचण्या करण्यात आल्या आहेत. त्यांपैकी २३ टक्के रुग्ण बाधित आढळले आहेत. मुंबईतील रुग्णवाढीचा सरासरी दर १.०६ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. तर रुग्ण दुप्पट होण्याचा कालावधी ६६ दिवसांवर पोहोचला आहे.

ठाणे जिल्ह्यात १ हजार ६४९ नवे रुग्ण

ठाणे : जिल्ह्यात शनिवारी १ हजार ६४९ नवे करोना रुग्ण आढळून आले असून, एकूण रुग्णसंख्या ७७ हजार ९५ वर पोहोचली आहे. दिवसभरात ४० रुग्णांचा करोनामुळे मृत्यू झाल्याने एकूण मृतांची संख्या २ हजार ११५ इतकी झाली आहे. ठाणे जिल्ह्यात शनिवारी दिवसभरात १ हजार ६४९ नवे करोना रुग्ण वाढले आहेत. त्यामध्ये कल्याण-डोंबिवली शहरातील ४३४, नवी मुंबईतील ३२३, ठाणे शहरातील ३०२, ठाणे ग्रामीणमधील २११, मीरा-भाईंदरमधील १४८, उल्हासनगर शहरातील १०४, बदलापूरमधील ४८, अंबरनाथमधील ४६ आणि भिवंडीतील ३३ रुग्णांचा समावेश आहे. तर शनिवारी जिल्ह्यात ४० जणांचा करोनामुळे मृत्यू झाला आहे. त्यामध्ये कल्याण-डोंबिवलीतील ९, नवी मुंबईतील ८, ठाणे ग्रामीणमधील ७, अंबरनाथमधील ६, ठाण्यातील ४, उल्हासनगरमधील ४ आणि मीरा-भाईंदरमधील २ रुग्णांचा समावेश आहे.

एकाच संकुलात ३६ बाधित

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : टाळेबंदी शिथिल झाल्यापासून झोपडपट्टीतील रुग्णांचा संसर्ग आटोक्यात आला असला तरी इमारतींमधील संसर्ग वाढला आहे. मुंबई सेंट्रल येथील नवजीवन सोसायटी या गृहनिर्माण संकुलात तब्बल ३६ रुग्ण आढळले असून, १८ इमारतींचा समावेश असलेले हे संपूर्ण संकुल पालिकेने प्रतिबंधित केले आहे.

मुंबईतील प्रतिबंधित क्षेत्रांची संख्या एका बाजूला कमी होत असली तरी प्रतिबंधित इमारतींची संख्या वाढत आहे. नवनवीन ठिकाणी मोठ्या संख्येने रुग्ण सापडू लागले आहेत. मुंबईतील ६३४ वस्त्या प्रतिबंधित आहेत, तर तब्बल सहा हजारांहून अधिक इमारती प्रतिबंधित आहेत. बोरिवली, कांदिवली, अंधेरी, मुलुंड, घाटकोपर, नाना चौक- मलबार हिल अशा उच्चभ्रू परिसरात मोठ्या संख्येने इमारती प्रतिबंधित होत आहेत.

नवजीवन सोसायटीत आतापर्यंत ६० रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी ३६ रुग्ण गेल्या दहा दिवसांतील आहेत, अशी माहिती साहाय्यक आयुक्त प्रशांत गायकवाड यांनी दिली. या सोसायटीतील अनेक जण विविध कामानिमित्त बाहेर जाणारे होते. त्यामुळे संसर्ग होत होता. परंतु सामाजिक अंतराचे कुठलेही नियम या संकुलात पाळले जात नसल्याचे आढळून आले. इमारतीत भाजीवाला बोलावला जातो, पण भाजी विकत घेताना रहिवासी गर्दी करतात. त्याचबरोबर सोसायटीतले सगळे नोकर एकाच ठिकाणी जेवतात, एकत्र वावरतात, एकाच वेळेला अनेक घरात काम करतात, असेही आढळून आले. त्यामुळे एकेक इमारत प्रतिबंधित करण्याऐवजी संपूर्ण संकुल प्रतिबंधित केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

पालिकेच्या या कारवाईला रहिवाशांनी विरोध केला. मात्र पुढचे चौदा दिवस या संकुलातील अत्यावश्यक सेवा कर्मचाऱ्यांना आणि वैद्यकीय उपचारांची गरज असलेल्या लोकांनाच बाहेर जाण्याची परवानगी दिली जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

प्रतिबंधित इमारतींची संख्या

- अंधेरी, जोगेश्वरी पूर्व - ७७७
- बोरिवली - ७२७
- कांदिवली - ५३१
- मालाड - ४५६
- मुलुंड - ४४१
- अंधेरी, जोगेश्वरी पश्चिम - ३६४
- एकूण- ६०३७

एसटी मुख्यालयालाही करोनाचा विळखा

मुंबई : करोनाचा विळखा एसटीच्या आगारातील कर्मचाऱ्यांबरोबरच मुंबईतील मुख्यालयालाही बसला आहे. आतापर्यंत राज्यभरात ३४८ एसटी कर्मचाऱ्यांना करोनाची लागण झाली असून, ९ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांपैकी ४ कर्मचारी हे एसटीच्या मुख्यालयातील आहेत.

मृत कर्मचाऱ्यांचे वारस किंवा कुटुंबीयांना ५० लाख रुपयांच्या मदतीची घोषणा एसटी महामंडळाने केली होती. मात्र, अद्याप एकाही मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना ही मदत मिळालेली नाही. ५० लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य देण्यावरून एसटीत गोंधळाची स्थिती असून चालक, वाहक, सुरक्षारक्षकांशिवाय अन्य कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना मदतीचा उल्लेख नाही. त्यामुळे अन्य कर्मचारी मदतीपासून वंचित राहणार आहेत.

महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे म्हणाले की, एसटी महामंडळाने अद्यापही परिपत्रकात बदल केले नाहीत. फक्त चालक, वाहक तसेच वाहतूक निरीक्षक, सुरक्षारक्षकांचा उल्लेख असून यात बदल करून करोनाकाळात कर्तव्यावर असलेल्या सर्व कर्मचारी व अधिकारी यांच्या कुटुंबीयांना मदत देण्याचा उल्लेख केला पाहिजे.

Surendera Dental College
Sri Ganganagar (Rajasthan)
MDS
Admission 2020
on last few seats
Eligibility BDS + NEET Gen. 220
SC/ST/OBC 188
Website: www. sdcri.in
Email: gorav@sgi.org.in
9829076285, 9829076116
9414093173, 9413385160, 9414210253

ONLINE ADMISSIONS 2020-21
FROM YOUR HOME
without visiting the Campus
3 STEP ONLINE ADMISSION PROCESS
1. Fill Online Application Form
2. Upload documents
3. Pay fees online
Affiliated to University of Mumbai

Ghanshyamdas Saraf college of arts & commerce
EDUCATION EMPOWERS
(Re-Accredited by NAAC with 'A' Grade)
www.sarafcollege.org
College Code: 59
admissions@sarafcollege.org

B.COM Bachelor of Commerce
BMS Bachelor of Management Studies
BA MMC Multimedia & Mass Communication
BCBI Banking & Insurance
BCAF Accounting & Finance
BFM Financial Markets
BScIT Information Technology
M.COM Master of Commerce

Deviprasad Goenka management college of media studies
INDIA'S PREMIER MEDIA SCHOOL
www.dgmc.org.in
College Code: 488
admissions@dgmcms.org.in

BA FTNMP Film, Television & New Media Production
BA MMC Multimedia & Mass Communication
MA FTNMP Film, Television & New Media Production
MA CJ Communication & Journalism

Ladhidevi Ramdhar Maheshwari night college of commerce
ENLIGHTENING FUTURE
www.lrmc.org.in
College Code: 526
admissions@lrmc.org.in

B.COM Bachelor of Commerce

RSET Campus, SV Road, Malad (W), Mumbai - 400 064

क्रॉम्पटन

क्रॉम्पटन ग्रिव्हज् कंझ्यूमर इलेक्ट्रीकल्स लिमिटेड

नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय : टॉवर ३, पहिला मजला, ईस्ट विंग, इक्यूनोक्स बिझनेस पार्क, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०००७०.
फोन : +९१-२२-६१६७ ८४९९ फॅक्स : +९१-२२-६१६७ ८३८३ सिआयएन : एल३१९००एमएच२०१५पीएलसी२६२२५४
ई-मेल : crompton.investorrelations@crompton.co.in वेबसाईट : www.crompton.co.in

३० जून २०२० रोजी संपलेले तिमाही अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्ष

(₹ कोटीमध्ये)

अनु. क्र.	तपशील	एकत्रित				एकमेव			
		तिमाही संपलेल्या			वार्षिक संपलेल्या	तिमाही संपलेल्या			वार्षिक संपलेल्या
		३०.०६.२०२०	३१.०३.२०२०	३०.०६.२०१९	३१.०३.२०२०	३०.०६.२०२०	३१.०३.२०२०	३०.०६.२०१९	३१.०३.२०२०
		अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित
१	कामकाजातून एकूण उत्पन्न	७३८.६८	१,०३८.३०	१,३६४.१४	४,५७९.३१	७३१.९३	१,०२९.९७	१,३६४.१६	४,५७०.८४
२	कालावधीकरीता करपूर्व निव्वळ नफा	१०१.०१	१३६.७२	१८८.४५	५९०.६९	९८.८१	१३३.९०	१८८.६१	५८८.२७
३	कालावधीकरीता करोत्तर निव्वळ नफा	७४.८०	१०२.१०	१२२.४४	४९६.३९	७३.७१	९९.८१	१२२.६०	४९४.७०
४	कालावधीकरीता एकूण संयुक्त उत्पन्न (समावेश नफा (करोत्तर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करोत्तर)	७४.२६	९९.५०	१२२.५७	४९४.२४	७३.१७	९७.२१	१२२.७३	४९२.५५
५	भरणा झालेले इक्विटी समभाग भांडवल	१२५.४६	१२५.४६	१२५.४०	१२५.४६	१२५.४६	१२५.४६	१२५.४०	१२५.४६
६	इतर इक्विटी				१,३४२.८८				१,३४२.३४
७	प्रति समभाग मिळकत (प्रत्येकी ₹ २) (वार्षिकीकृत केलेले नाही)*								
	मूळ प्रतिभाग	१.१९*	१.६३*	१.९५*	७.९२	१.१८*	१.५९*	१.९६*	७.८९
	मिश्रित प्रतिभाग	१.१८*	१.६२*	१.९४*	७.८५	१.१७*	१.५८*	१.९४*	७.८३

टीपा:

१. उपरोल्लिखित निष्कर्ष हे सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ मधील विनियम ३३ अनुसार स्टॉक एक्स्चेंजकडे सादर केलेल्या तिमाही आर्थिक निष्कर्षांच्या तपशीलवार नमुन्यांचा सारांश आहे. संपलेल्या तिमाहीचे आर्थिक निष्कर्षांचे संपूर्ण नमुने स्टॉक एक्सचेंजच्या [www.bseindia.com & www.nseindia.com], या संकेतस्थळांवर आणि कंपनीच्या www.crompton.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
क्रॉम्पटन ग्रिव्हज् कंझ्यूमर इलेक्ट्रीकल्स लिमिटेड करीता
सही/-
शांतनू खोसला
व्यवस्थापकिय संचालक
डिआयएन : ०००५९८७७

स्थान : मुंबई
दिनांक : २४ जुलै २०२०

टाटा मोटर्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई-४०० ००१.
ईमेल : **inv_rel@tatamotors.com**, वेबसाइट : **www.tatamotors.com**,
टेलि.: +९१ २२ ६६६५ ८२८२
सीआयएन नं.: एल२८९२०एमएच१९४५पीएलसी००४५२०

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन्स २९ व ४७ च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की, ३० जून, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिता लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष (स्वतंत्र) व अलेखापरीक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्ष (मर्यादित परीक्षणासह), इतर गोष्टींसमवेत, विचारात घेण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा शुक्रवार, ३१ जुलै २०२० रोजी घेण्यात येणार आहे.

सूचना **www.tatamotors.com/investor/** या कंपनीच्या वेबसाइटवर तसेच **www.bseindia.com** या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर आणि **www.nseindia.com** या नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे व सदस्य तपशिलाकरिता सदर सूचना पाहू शकतील.

टाटा मोटर्स लिमिटेडकरिता
होशंग के. सेठना
कंपनी सेक्रेटरी

स्थळ : मुंबई
तारीख : २५ जुलै २०२०

TATA

युएफओ मुव्हीझ इंडिया लिमिटेड

UFO CINE MEDIA NETWORK

सीआईएन: L22120MH2004PLC285453.
नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय: वेल्युएबल टेकनो पार्क, प्लॉट -५३/१, रोड -७, एमआयडीसी, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई -४०००९३
फोन: + ९१ (२२) ४०३०५०६० फॅक्स: ९१ (२२) ४०३०५११०
ई-मेल : investors@ufomoviez.com. वेबसाईट : www.ufomoviez.com

युएफओ मूवीझ इंडिया लिमिटेड ची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटिस, व्हिडिओ कॉन्फरन्स (VC) / इतर ऑडिओ व्हिज्युअल साधनांच्या (OAVM) माध्यमातून घेण्यात येईल

याद्वारे सूचित करण्यात येते की १६ व्या एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी कोर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाचे क्र. १४/२०२० दिनांकित ८ एप्रिल, २०२०, क्र. १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल, २०२०, क्र. २०/२०२० दिनांकित ५ मे, २०२० ("एमसीए परिपत्रके") या सामान्य परिपत्रकांच्या आणि कंपनी कायदा २०१३ मधील इतर लागू तरतुदींच्या आणि भारतीय सुरक्षा आणि विनिमय मंडळाने दि. १२ मे, २०२० रोजी जाहीर केलेल्या परिपत्रकाच्या ("सेबी परिपत्रक") अनुपालनामध्ये, युएफओ मूवीझ इंडिया लिमिटेड ("कंपनी") च्या सदस्यांची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, सार्वजनिक ठिकाणी सभासदांच्या शारीरिक उपस्थितीशिवाय, व्हिडिओ कॉन्फरन्स (VC) / इतर ऑडिओ व्हिज्युअल साधनांच्या (OAVM) माध्यमातून गुरूवार, २० ऑगस्ट २०२० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केली जाईल.

सदर एमसीएच्या परिपत्रकांच्या आणि सेबीच्या परिपत्रकाच्या अनुपालनामध्ये, १६ व्या एजीएमच्या नोटीसच्या इलेक्ट्रॉनिक प्रती, ई-मतदानाची प्रक्रिया व सूचना आणि २०१९-२० चा वार्षिक अहवाल ज्या सदस्यांचे ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत त्यांना पाठवले जातील.

ज्या सदस्यांनी आपला ई-मेल एड्रेस नोंदविलेला नाही त्यांनी इलेक्ट्रॉनिक स्वरुपात धारण केलेल्या समभागांच्या संदर्भात त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट(न्ट्स) कडे आणि भौतिक स्वरूपात धारण केलेल्या समभागांच्या संदर्भात रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट (आरटीए) - केएफइन टेक्नोलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, सेलेनियम टावर बी, प्लॉट ३१-३२, गाचीबोवली, नानकरामगुडा, हैदराबाद - ५०० ०३२ यांना पत्र पाठवून, त्यांच्या ई-मेल एड्रेसची नोंदणी करावी.

वार्षिक अहवाल २०१९-२० आणि १६ व्या एजीएमची नोटीस (ई-मतदानाच्या सूचनांसह) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्राप्त करून घेण्याच्या मर्यादित हेतूसाठी कंपनीने सदस्यांना https://ris.kfintech.com/email_registration/, या लिंकवर प्रवेश करून त्यांचे ईमेल एड्रेस तात्पुरते अद्यतनित करून घेण्याची सुविधा करून दिलेली आहे.

१६ व्या एजीएमची नोटीस व वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइट https://www.ufomoviez.com/investor वर, आरटीएच्या वेबसाईट https://evoting.karvy.com/ वर, आणि बीएसई लिमिटेडच्या वेबसाइट https://www.bseindia.com/ वर तसेच नेशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइट https://www.nseindia.com/ वर उपलब्ध करण्यात येतील.

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ ("नियम") सह वाचण्यात येत असलेल्या कंपनी कायदा, २०१३ (कायदा) च्या कलम ९१ च्या आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स व डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) विनियम, २०१५ च्या विनियम ४२ च्या अनुषंगाने, असे कि एजीएमच्या हेतुकरीता कंपनीची सभासदांची नोंदवही व हस्तांतरणाची पुस्तके शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२० ते गुरुवार, २० ऑगस्ट, २०२० पर्यंत (दोन्ही दिवसांसह) बंद राहतील.

एजीएममध्ये रिमोट ई-मतदान आणि ई-मतदान या दोन्ही माध्यमातून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांचा मतदानाचा हक्क बजावण्याची सुविधा कंपनी आपल्या सदस्यांना देईल. एजीएममध्ये आणि रिमोट ई-मतदान / ई-मतदान मध्ये सामील होण्याची तपशीलवार प्रक्रिया १६ व्या एजीएमच्या नोटीसमध्ये देण्यात आलेली आहे. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरमची गणना करण्याच्या हेतूने व्हिसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून एजीएममध्ये उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची संख्या मोजली जाईल.

यूएफओ मूव्हिज इंडिया लिमिटेडकरिता
सही/-
समीर चव्हाण
कंपनी सचिव (एफसीएस-७२११)

दिनांक :२५ जुलै २०२०
ठिकाण : मुंबई

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ईमेल: ig-mcxccl@mcxccl.com | वेबसाइट: www.mcxccl.com

३० जून, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरीता अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० जून २०२० अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२० लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० जून २०१९ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२० लेखापरीक्षित
प्रचालनातून एकूण उत्पन्न	१,७३७.२१	२,००४.२७	१,५५०.६८	७,१५३.१३
कालावधीकरिता निव्वळ नफा (कर अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	६२६.५०	८०२.५८	४८९.७८	२,६७१.५५
कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	६२६.५०	८०२.५८	४८९.७८	२,६७१.५५
कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	६२६.५०	८३४.९०	३४०.६४	२,७९२.१५
कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	६२०.१४	८३३.७९	३४०.१७	२,७८०.४०
समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्यालेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	(१८,७५०.८४)
प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)*				
मूलभूत (₹)	०.२६	०.३५	०.१४	१.१६
सौमिकृत (₹)	०.२६	०.३५	०.१४	१.१६

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

सूचना:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ **www.mcxccl.com** वर उपलब्ध आहे.
२. दिनांक २५ जुलै २०२० रोजी, वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: २५ जुलै २०२०